जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक -१४५ दिनांक -२८/०२/२०२४

वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर

# शुभम गायकवाड (टोळी प्रमुख) व त्याचे ०७ साथीदार यांचेविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई

यातील फिर्यादी हे एक नामंकित कंपनीत पार्टटाईम डिलेव्हिरी बॉय म्हणुन काम करीत असुन दि.२६/०१/२०२४ रोजी मोबाईलवर आलेल्या ऑर्डरप्रमाणे एका ग्राहकाची ऑर्डर देणेसाठी दुचाकी गाडीवरुन रामटेकडी येथे जावुन गाडी पार्क करुन ग्राहकाचे सांगणेप्रमाणे डॉ.डब्ल्यु.आर. खान ऊर्दु शाळेच्या मागील गल्लीत सार्वजनिक शौचालयाजवळ आण्णाभाऊ साठे वाचनालय रामटेकडी हडपसर पुणे येथुन ग्राहक यांना त्याचे घरी ऑर्डर देणेसाठी जात असताना अंधारात तीन ते चार इसमानी अचानकपणे आडवे येवुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन जबरदस्तीने सॅक चेक करुन सॅक मधील हार्ड डिस्क, चेक बुक, २०००/- रुपये रोख रक्कम धारदार हत्याराचा धाक दाखवुन फिर्यादी यांचेकडुन जबरदस्तीने हिसकावुन घेवुन पळुन गेले होते. म्हणुन फिर्यादी यांनी तीन ते चार अनोळखी इसमांविरूध्द कायदेशिर तक्रार दिल्याने **वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं.९७/२०२४ भादंविक ३९५,३९२,५०४,५०६,३४ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी नामे :- **१)करण किसन शिंदे वय १९ वर्षे, रा.अंधशाळेचे पाठीमागे रामटेकडी हडपसर पुणे.(टोळी सदस्य) २) मुज्जमिल मतीन शेख वय १८ वर्षे रा. आनंदनगर रामटेकडी हडपसर पुणे.(टोळी सदस्य) ३) ओम राजु भैनवाल वय १८ वर्षे, म्हाडा बिल्डींग रामटेकडी हडपसर पुणे. (टोळी सदस्य) यांना दाखल गुन्हयाचे अनुषंगाने अटक करण्यात आली आहे.** ४) शुभम राघु गायकवाड वय २४ वर्षे, रा.आनंदनगर रामटेकडी हडपसर पुणे. **(टोळी प्रमुख,पाहिजे आरोपी)** ५) विशाल रवि जाधव रा. अंधशाळेचे पाठीमागे रामटेकडी हडपसर पुणे. **(टोळी सदस्य,पाहिजे आरोपी)** तीन **(विधिसंघर्षित बालक) यांना ताब्यात घेतले आहे.**

दाखल गुन्ह्यातील शुभम राघु गायकवाड वय २४ वर्षे, रा. स.न.१०८/१०९ आनंदनगर रामटेकडी हडपसर पुणे. (टोळी प्रमुख,पाहिजे आरोपी) यानी वेळोवेळी त्याचे साथीदार बदलुन त्यामध्ये विधिसंघर्षित बालक यांचाही समावेश करून संघटीतपणे मालाविरूध्दचे व शरिराविरुध्दचे गुन्हे केलेले आहेत. त्यामध्ये त्यांनी संगणमत करुन जीवे मारण्याचा प्रयत्न करणे,सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशीर जमाव जमविणे, इतरांचे जीवित व व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती करणे,प्राणघातक हत्यारासह सज्ज होऊन बेकायदे शीर जमावात समील होणे, बेकायदेशीर गृह-अतिक्रमण करून विस्तव किंवा स्फोटक पदार्थाने नुकसान करणे, दरोडा टाकणे इ. प्रकारचे गुन्हे करून सदर भागातील लोकांच्या मनात दहशत निर्माण होईल असे कृत्ये करून स्वतःचे अस्तीत्व लपविण्यासाठी वेळोवेळी त्यांनी वेगवेगळया प्रकारचा पेहराव करून अशा प्रकारचे

गंभीर स्वरूपाचे गुन्हे करण्याची एक प्रकारची त्यांना सवयचं लागून गेलेली आहे. जबरी चोरी सारखे गंभीर स्वरूपाचे टोळी प्रमुख व टोळी सदस्य यांनी एकत्रीत संगणमत करून गुन्हे केलेले आहेत. टोळी प्रमुख व टोळी सदस्य यांनी स्वतःचे व टोळीचे गैरवाजवी,आर्थिक व इतर फायदा मिळविणेकरीता गुन्हे केलेले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दाखल गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) चा अंतर्भाव करणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर श्री संजय पंतगे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त परीमंडळ ५,पुणे श्री.आर राजा यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.मनोज पाटील, यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं ९७/२०२४ भा.दं.वि.कलम ३९५,३९२,५०४,५०६,३४ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ या गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.मनोज पाटील, यांनी मान्यता दिलेली आहे.

दाखल गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त, वानवडी विभाग पुणे शहर श्री.गणेश इंगळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त, श्री. प्रविण पवार,मा.अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग श्री.मनोज पाटील,मा.पोलीस उप आयुक्त, परि- ५, श्री.आर.राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त, वानवडी विभाग पुणे शहर,श्री.गणेश इंगळे, त्यांचे मार्गर्शनाखाली वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पतगे सहा. पोलीस निरीक्षक,दिगंबर बिडवे, श्रेणी.पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव शेलार, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार मनोज साळुंखे, अमोल कदम, उत्रेश्वर धस, महिला पोलीस अंमलदार, चैत्राली यादव यांनी केलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर भर देवुन शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचे उद्देशाने कठोर पावले उचलण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **२०२४ या चालु वर्षातील मकोका अंतर्गत केलेली ही १४ वी कारवाई आहे.**